
# राजहंस पुस्तक पेठ

साई सरस्वती, शिक्षक नगर, गल्ली क्र. ७ च्या सुरवातीच्या चौकात, परमहंसनगर, वनाजजवळ,पौड रोड, पुणे ४११०३८

संपर्क : ९३२२६३०७०३ / email : : rajhanspustakpeth@gmail.com

## हे वाचलं का?

रसिक वाचक मित्रहो !
सातत्याने बाजारात इतकी नवी पुस्तके येत असतात, की पुस्तक पेठेत आल्यावर नेमके कोणते पुस्तक घ्यावे तेच उमजत नाही. म्हणूनच आम्ही अधून मधून काही खास नव्या पुस्तकांची शिफारस करून माहिती देत असतो – 'हे वाचलं का?' या सदरात. तर याच सदरात आज नव्याने आलेल्या दहा उत्तम पुस्तकांची माहिती देत आहोत.
जरूर खरेदी करून वाचा ही पुस्तके !





1. **पुस्तकाचे नाव : कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या !**

**लेखक : सुहास बहुळकर**

**किंमत : 1000/-** **विशेष सवलतीत : 750/-**

भारतीय इतिहासाला निर्णायक राष्ट्रीय वळण लावणारे महापुरुष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज ! त्यांचे व्यक्तिमत्त्व समाजाला नेहमीच प्रेरणा देत आले. मध्यंतरीचा काही काळ सोडला, तर सतत त्यांची प्रतिमा देशीविदेशी कलाकारांना आव्हान देत आली, आवाहन करीत आली. असंख्य चित्रकारांनी छत्रपती शिवरायांच्या आयुष्यातले अगणित चित्तथरारक, रोमहर्षक प्रसंग चितारले; तर कित्येक शिल्पकारांनी कधी अर्धाकृती, कधी पूर्णाकृती, तर कधी अश्वारूढ शिवाजी महाराज घडवले. त्यांच्या त्या त्या कलाविष्कारामागे दडलेल्या संघर्षकथासुद्धा तितक्याच लक्षणीय आहेत. कुणाची स्वप्ने साकार झाली, गौरवली गेली; तर कुणाकुणाची स्वप्ने भंग पावली, अधुरी राहिली. अशा असंख्य कथांचे आणि तशाच व्यथांचे हे अनोखे संकलन.सर्वांच्या केंद्रस्थानी आहेत, ते मात्र हिंदवी स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज !

भारतीय कलेतिहासाचे साहित्यिक जतन-संवर्धन करण्याचा ध्यास घेतलेल्या सुहास बहुळकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रकथी शैलीतले हे पुस्तक म्हणजे इतिहास, चित्रकला आणि शिल्पकला या तिन्ही क्षेत्रांतील असंख्य मान्यवरांच्या अतुलनीय कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदनाच आहे




**2. पुस्तकाचे नाव : आत्महत्या हे उत्तर नाही**

**लेखक : डॉ. संज्योत देशपांडे ( मानसोपचारतज्ज्ञ )**

**किंमत : 400/-** **विशेष सवलतीत : 300/-**

आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर येणाऱ्या हतबलतेतून, हताशपणातून, नैराश्यातून, नकारात्मकतेतून बाहेर पडण्याचा आत्महत्या हा खरंच एकमेव मार्ग आहे? नाही... खरंतर आत्महत्या हे उत्तरच असू शकत नाही. सातत्याने येणारं अपयश, भोवतालीची निराशाजनक परिस्थिती, त्यातून वाढत जाणारी असुरक्षिततेची भावना, यामुळे काही माणसं हतबल होतात. तीव्र स्वरूपाची नकारात्मकता मनाला ग्रासून टाकते आणि एका टप्प्यावर माणूस टोकाचा निर्णय घेऊन टाकतो, स्वत:ला संपवण्याचा...

परिस्थितीपुढे हताशपणे शरण जाणाऱ्या आणि आपल्या जीवाची किंमत देणाऱ्या प्रत्येकाने अशावेळी काही प्रश्न स्वत:ला विचारायलाच हवेत...

- *खरंच समोरची परिस्थिती निश्चितच खूप कठीण, कदाचित खूप आवाक्याबाहेरची असू शकते. पण याहीपेक्षा आपल्याला एकदाच मिळणारं आयुष्य, आपला जीव जास्त मोलाचा नाही का?*
- *ही परिस्थिती कधीच बदलणार नाही, ही परिस्थिती कायमस्वरूपी अशीच राहणार आहे याच गोष्टीबाबत आपण इतके शाश्वत, ठाम का आहोत?*
- *कोणत्याही गोष्टीची खात्री आपण देऊ शकत नाही, मग याच गोष्टीची आपण इतकी खात्री का बाळगत आहोत?*

आपल्या जगण्यातल्या समस्या, गेलेली प्रतिष्ठा, तुटलेली नाती, गमावलेल्या गोष्टी, झालेलं दु:ख या सगळ्यांसाठी काही ना काही उत्तर सापडतं, कारण ते असतंच! कदाचित परिस्थिती मनासारखी बदलणार नाही पण तिला सामोरं जाण्यासाठी मनाने अधिक सक्षम होताच येतं.

यातनामय नाइलाज वाट्याला येणं हा कोणाच्याही गोष्टीचा शेवट असूच शकत नाही.

आयुष्याला नकार देऊ नका!

आपल्याला आयुष्याला होकारच द्यायचा आहे, Say yes to life ..

अशा हरलेल्या मन:स्थितीत स्वत:साठी आणि गरज असणाऱ्या आसपासच्या ए
खाद्याला मदत करण्यासाठी प्रत्येकाने जवळ बाळगावं असं हे पुस्तक!
सध्याच्या वातावरणात, प्रत्येक घरात, घरातल्या प्रत्येकाने वाचलंच पाहिजे !!




**3. पुस्तकाचे नाव : अंतरंग**


**लेखक : कुमार केतकर**

**किंमत : 299/-** **विशेष सवलतीत : 225/-**

केतकर हे सर्वव्यापी आणि अर्थातच सर्वस्पर्शी आहेत, हे त्यांच्या या लिखाणाच्या सर्व व्यापावरून दिसून येते. त्यांनी लिहिलेल्या, परंतु यात समाविष्ट नसलेल्याही काही प्रस्तावना असतील आणि कदाचित त्या खंड दोनमध्ये प्रकाशित होतील.

मला अनेक जण विचारतात, 'केतकर कसे आहेत ?' केतकर हे स्वभावाने म्हणाल तर 'मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास' आहेत. ते कधी चिडल्याचे मी पाहिलेले नाही. तसे ते शांत नाहीत; तरी एखाद्या खोडकर, पण निरागस मुलाइतकेच ते आहेत. या प्रस्तावना म्हणजे त्यांच्या स्वभावशैलीचा एक सुंदर कोलाज आहे. त्यांच्या स्वभावातला प्रत्येक पैलू आपल्याला या चित्रणात पाहायला मिळतो. त्यांचे लेखन हे निर्दोष असते आणि आमच्यासारख्यांच्या लेखनात जे शेवटच्या क्षणापर्यंत शोध घेतले जातात, ते त्यांच्या लेखनात कधीही दिसत नाहीत.

- **अरविंद व्यं. गोखले**





**4. पुस्तकाचे नाव : एकांकिका**

**संपादन : विशाखा कशाळकर**

**किंमत : 400/-** **विशेष सवलतीत : 300/-**

नाटक ही सांघिक कला आहे. नाटक करायचे तर टीमची गरज लागते. उपजत लेखनकला एकलव्याप्रमाणे विकसित करणाऱ्या विद्यार्थिदशेतील लेखकांना त्यांच्याजवळील उपलब्ध संस्थेत, कॉलेजात बऱ्याचदा प्लॅटफॉर्म मिळत नाहीत. एकांकिका करणारी टीम अशा एकांड्या लेखन शिलेदारांना हेरणारच नसेल तर हे स्वयंभू एकांकिका लेखक स्वतःला पारखणार तरी कसे? हे झाले महाविद्यालयीन लेखकांचे. जुन्याजाणत्या एकांकिका लेखकांना भेडसावणारी समस्याही वेगळी नाही. एकांकिका लिहायची तर कुणासाठी? सोबत टीम नाही... टीमशिवाय कुठेही सादर करू शकत नाही. मग अशा स्थितीत ही एकांडी लेखनकला तगणार कशी? लिहिण्याची प्रेरणा टिकून कशी राहाणार? या साऱ्या विचाराने, मी विशाखा कशाळकर प्रतिष्ठानच्या पुढाकाराने कोणताही सुप्त व्यावसायिक हेतू न ठेवता निःस्पृह, पारदर्शी हेतू ठेवून 'लेखकांसाठी खुला एकांकिका वाचन मंच'ची निर्मिती केली.
फक्त नवोदितांनाच नाही तर, सर्व मराठी एकांकिका लेखकांना, प्रत्येक महिन्याला उपलब्ध असलेले आजमितीस हे 'एकमेव व्यासपीठ' !!!
महाराष्ट्रभरात वर्षभर १२ महिने सलग राबविलेला हा उपक्रम. यात १२ उपक्रमांत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या १२ विजेत्या एकांकिकांच्या संहिता या पुस्तकात आहेत.
सोबतच 'एकांकिका' या साहित्यिक प्रकाराचे समग्र रूप या पुस्तकाला यावे म्हणून एकांकिकाविषयीचे अत्यंत महत्त्वाचे सहा लेख यात छापले आहेत.

- ***विशाखा कशाळकर-संपादक***





**5. पुस्तकाचे नाव : स्वतंत्र भारताची सहा युद्धे ( १९४७ -२०२४ )**

**लेखक : किरण गोखले**

**किंमत : 700/-** **विशेष सवलतीत : 525/-**

दोन राष्ट्रांमधले युद्ध असो किंवा दोन विरोधी गटांतील देशांमधले, युद्धाचा अंतिम निकाल अनेक घटकांवर अवलंबून असतो. उदा. प्रतिस्पर्धी सैन्यदलांची लष्करी गुणवत्ता किंवा कौशल्य, त्यांचे सैनिक, शस्त्रास्त्रे व इतर साधनसामग्री यांचे सांख्यिक व तांत्रिक प्राबल्य, चपखल रणनीती व प्रत्यक्ष रणांगणावरील डावपेच इत्यादी. पण सर्वांत महत्त्वाचा घटक ठरतो तो म्हणजे प्रतिस्पर्धी देशांच्या राजकीय व लष्करी नेतृत्वाची गुणवत्ता व या नेत्यांची प्रत्यक्ष युद्धकाळातील कामगिरी. कारण हे नेतेच युद्धावर प्रभाव टाकणाऱ्या इतर सर्व घटकांसाठी म्हणजे दर्जेदार शस्त्रास्त्रांची उपलब्धता, सैन्याची व जनतेची मानसिकता, युद्धाची कारणे व उद्दिष्टे यांसाठी जबाबदार असतात.
स्वतंत्र भारताच्या सहा युद्धांचे वास्तवदर्शी वर्णन व तर्कशुद्ध विश्लेषण करताना साहजिकच या सर्व युद्धांतील युद्धपूर्व व युद्धकाळातील भारताच्या राजकीय व लष्करी नेतृत्वाचे विश्लेषण करणे अत्यावश्यक ठरते. पण आजपर्यंत असे चिकित्सक मूल्यमापन व विश्लेषण फारसे कधीच केले गेले नाही. युद्धशास्त्र, युद्धनेतृत्व व जागतिक युद्ध-इतिहास यांचे विश्लेषक किरण गोखले यांनी या पुस्तकात स्वतंत्र भारताच्या प्रत्येक युद्धाच्या वाटचालीचे, त्यातील महत्त्वाच्या लढायांचे, डावपेचांचे सखोल व तपशीलवार वर्णन तर केले आहेच पण त्याहूनही महत्त्वाचे ठरावे असे भारताच्या राजकीय व लष्करी नेतृत्वाचे सडेतोड, तर्कसुसंगत व नावीन्यपूर्ण आणि खळबळजनक असे टीकात्मक विश्लेषणही केले आहे.
प्रत्येक आजी-माजी लष्करी व सनदी अधिकारी, राजकीय नेते, युद्धशास्त्र, रणनीती आणि इतिहासाच्या अभ्यासकांनी, प्राध्यापकांनी, शालेय शिक्षकांनी तसेच स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांनी मनन करावे असे हे पुस्तक आहे. प्रत्येक देशप्रेमी युवक-युवतीने तर या पुस्तकातील निष्कर्षांचा नीट अभ्यास केला पाहिजे व आपल्या व भारताच्या वेगवान प्रगतीसाठी त्यांचा आपल्या जीवनात प्रत्यक्ष वापरही केला पाहिजे.





### 6. पुस्तकाचे नाव : शोध बदलत्या पृथ्वीचा

**लेखक : सुनीत पोतनीस**

**किंमत : 400/-** **विशेष सवलतीत : 300/-**

आपल्या पृथ्वीची निर्मिती झाली सुमारे साडेचार अब्ज वर्षापूर्वी. जन्मापासून आजपर्यंत तिच्या प्रकृतीत सततचे बदल चालूच आहेत. तिच्या अंतरंगात चाललेल्या प्रचंड घडामोडींचा आणि त्यामुळे तिच्या प्राकृतिक घटकांमध्ये अन् बाह्य रूपामध्ये होणाऱ्या बदलांचा शोध अन् वेध घेणं ही कधीही न संपणारी गोष्ट!
कोट्यवधी वर्षांपासून चालू असलेल्या या बदलांना कारणीभूत असलेल्या ज्वालामुखी, भूकंप, सुनामी, चक्रीवादळे यांसारख्या प्रचंड उलथापालथींबाबतची शास्त्रीय माहिती जिज्ञासू वाचकाला रंजक आणि सुबोध पद्धतीने स्पष्ट करून सांगणारे
शोध बदलत्या पृथ्वीचा





### 7. पुस्तकाचे नाव : वास्तविकतेचे रंग

**लेखक : दिलीप फडके**

**किंमत : 340/-** **विशेष सवलतीत : 255/-**

ही कहाणी आहे आजच्या काळाची, भोवतालच्या वर्तमानाची अन् या वर्तमानात वावरणाऱ्या व्यक्तींची, समाजाची, जनसमूहाची आणि जनमानसाची. ही कहाणी आहे एका धैर्यवान मुलीची. प्रतिकूल परिस्थितीत जन्म, पण तिच्यावर मात करणारी जिद्द.शिक्षणाने दिलेली क्षमता अन् सामर्थ्य. त्यातून लाभलेल्या आत्मविश्वासातून ती लढायला शिकली. लढा जातिभेदाशी. लढा लोकांच्या पूर्वग्रहांशी. आपली स्वप्नं वास्तवात आणताना येणाऱ्या अडथळ्यांशी. आपलं भविष्य घडवताना त्याला डागाळणाऱ्या वर्तमानाशी.या लढ्यात तिला यश मिळालं का ? या लढ्यात तिला आपल्या जोडीदाराची किती साथ मिळाली ? की वर्तमानातल्या विटक्या रंगांनी तिच्या स्वप्नांना डागाळून टाकलं ?
आजच्या समस्यांची गुंतागुंत उलगडत व्यामिश्र वर्तमानाचा वेध घेणारी कादंबरी
वास्तविकतेचे रंग





### 8. पुस्तकाचे नाव : महाराष्ट्रातील प्रबोधन पुढील दिशा

**लेखक : मिलिंद बोकील**

**किंमत : 90/-** **विशेष सवलतीत : 70/-**

धर्म राज्यसंस्थेला खातो म्हणजे काय ? धर्म काय वाघ आहे का की तो राज्यसंस्थेला खाईल ? राज्यसंस्था तर किती तरी बलवान असते. तिच्याकडे पोलीस, सैनिक, विमाने, रणगाडे असतात. धर्म कसा तिला खाईल ?
धर्म वाघासारखा खात नाही तर वाळवीसारखा खातो. धर्माची वाळवी कशी लागते ह्याचे उत्तम उदाहरण कुंभमेळ्याचे. कुंभमेळ्याने राज्यसंस्थेला आपली नेहमीची कार्ये बाजूला ठेवून भाविकांची व्यवस्था ठेवायला भाग पाडले. व्यवस्था म्हणजे काय ? तर बांबूंचे कठडे बांधणे, पार्किंगची व्यवस्था करणे, विशेष गाड्या सोडणे, इस्पितळे उभारणे, हरवले-सापडल्याची नोंद घेणे, इत्यादी. ह्या कामासाठी शेकडो अधिकारी आणि हजारो कर्मचाऱ्यांची फौज जुंपली गेली. राज्यसंस्थेची शक्ती जी शाळा दवाखाने चालवणे, उद्योगधंदे उभारणे, जलसिंचन पुरवणे, कौशल्य-निर्मिती करणे, शेती सुधारणे अशा महत्त्वाच्या कामांसाठी लागली पाहिजे ती भाविकांच्या अंघोळीसाठी लावली गेली. सर्वात शोचनीय गोष्ट म्हणजे केवळ निरनिराळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनाच नाही तर पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांना धर्माने संगमावर डुबकी मारायला लावली. धर्म राज्यसंस्थेला खातो ते अशा प्रकारे !

## 9. पुस्तकाचे नाव : अज्ञात मुंबई - ०१




**लेखक : नितीन साळुंखे**


**किंमत : 475/-** **विशेष सवलतीत : 355/-**

सात बेटं असल्यापासून किंबहुना त्याही आधी कधी तरी अस्तित्वात आलेल्या या मुंबई नगरीचा आजवरचा सारा प्रवास जाणून घेण्याचं या माणसाला अफाट वेड/आहे. मग तो अख्खी मुंबई पालथी. घालतो. जुनी दफ्तरं शोधतो. मुंबईविषयी कळलेला कुठलाही लहानमोठा तपशील, माहिती तो बारकाईने तपासून घेतो. 'ही अशी शोध मोहीम चालू असतानाच ज्यांना कुतूहल आहे त्यांना मुंबईची कहाणी सांगत सुटतो. सोशल मीडियावर भरभरून लिहीत सुटतो. इथे रोजीरोटीचा विचार दुय्यम ठरतो. यांतून हाती काय लागतं तर अज्ञात मुंबई ! तीच सारी धावपळ म्हणजे हे पुस्तक 'अज्ञात मुंबई'!--

माझी खात्री आहे की हे पुस्तक वाचल्यानंतर वाचक मुंबईभर आपापल्या कामानिमित्त फिरताना आजवर जसे फिरत होते तसे न फिरता, तर या पुस्तकाने परिचय करून दिलेली 'मुंबई' नीट पाहत जातील. जाताजाता त्या काळात फेरफटकाही मारून येतील. मुंबईत एका जागी थांबून राहायला कुणाला वेळ नसतो, सवड त्याहून नसते. जो तो धावतच असतो. परंतु हे पुस्तक वाचणारा क्षणभर का होईना आता जातायेता जागीच थांबणार. रोजचंच हे सभोवताल पाहणार आणि अचंबितही होणार... अशी होती मुंबई...?"

- **अशोक राणे**

## 10.पुस्तकाचे नाव : अज्ञात मुंबई – ०२





**लेखक : नितीन साळुंखे**

**किंमत : 599/-** **विशेष सवलतीत : 450/-**

मुंबई आता पहिल्यासारखी राहिली नाही' – आज साठी-सत्तरीत असलेल्या मुंबईकराच्या तोंडून अशी खत वारंवार ऐकायला मिळत असते. परंतु मुंबई ही प्रवाही नगरी आहे. ती सतत बदलत आली आहे. मुंबईकराची प्रत्येक नवी पिढी त्या बदलांबरोबर कधी आपखुशीने, कधी नाइलाजाने मुंबईला उराशी बाळगून असते आणि मुंबई त्याला ! मुंबई आणि मुंबईकराच्या या प्रेमसंबंधातूनच तर रोजच्या वावरातल्या मुंबईची कालची एखादी खूण सापडते तेव्हा तो हरखून जातो. मुंबईकराच्या मनाच्या तळाशी दडलेल्या या कुतूहलाला जागे करण्याचा प्रयत्न म्हणजेच नितिन साळुंखे यांचे 'अज्ञात मुंबई' हे पुस्तक आणि एकदा चाळवलेले ते कुतूहल पुरवणारे त्यांचे नवे पुस्तक म्हणजे प्रस्तुत 'अज्ञात मुंबई २'.
मनोविकास प्रकाशनचा पत्ता पुण्याचा असला तरी प्रकाशक अरविंद पाटकर हे अगदी गाभ्यातून मुंबईकर आहेत, याचाही हा पुरावाच. हा प्रयत्न जितका अभ्यासपूर्ण आहे तितकाच लोभस आणि कुतूहल-भूक वाढवणारा आहे. मुंबईबाहेरच्या माणसाला असलेलं मुंबईविषयीचं आकर्षण लपून राहिलेलं नाही. त्याचं रूपांतर प्रेमात होतानाही प्रत्ययाला येतच असतं... प्रस्तुत पुस्तकामुळे त्या प्रेमाला मुंबईच्या जपणुकीचंही अस्तर लावलं पाहिजे अशी भावना झाली तर मुंबई आणखी 'बाका नगरी' ठरेल...

- **रेखा देशपांडे**

**पत्रकार, लेखक, अनुवादक**




# राजहंस पुस्तक पेठ

साई सरस्वती ,शिक्षक नगर ,

गल्ली क्र.०७ च्या सुरुवातीस ,परमहंस नगर ,

वनाज जवळ , पौड रोड, वनाज मेट्रो स्टेशन जवळ , कोथरूड  पुणे ४११ ०३८

**संपर्क : 9322630703**

वेळ :  मंगळवार ते रविवार  स. १०.३० ते  रा. ०८.०० ( सोमवारी साप्ताहिक सुट्टी )